## केतकी शहा



# मात

# मात

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मात

कादंबरी

लेखिका

## केतकी शहा

# मात (लघुकादंबरी)

लेखिका : केतकी विजयानंद शहा

ketakishahtheauthor@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २ जून २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## नमस्कार रसिक वाचकहो !!

माझ्या "अबोली", "अरुणोदय" आणि “क्षणभंगूर” या पहिल्या तीन पुस्तकांना आपणा सर्वांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. माझ्या लेखनाला आपण दिलेल्या उदंड प्रेम, आशीर्वाद आणि प्रतिसादाबद्दल मी आपणा सर्वांची आभारी आहे.

आपण रसिक वाचकांनी घेतलेली दखल आणि दिलेले प्रोत्साहन मला नवनवीन विषयांवर लेखन करण्यास, न पाहिलेल्या क्षितिजाला गवसणी घालण्यास प्रोत्साहित करत आहे. त्यातूनच या माझ्या चौथ्या पुस्तकाचा जन्म झाला..

याही प्रयत्नाला आपणा सर्वांचे भरभरून प्रेम आणि आशीर्वाद लाभेल अशी आशा करते..

माझ्या कथेला तुम्हा रसिक वाचकांपर्यंत पोहचवण्यात साहित्य सेतूचे काम करणाऱ्या ई साहित्य टीम आणि सुनील सामंत यांची मी मनःपूर्वक आभारी आहे..

-केतकी विजयानंद शहा

ketakishahtheauthor@gmail.com

# नमस्कार रसिक वाचकहो!!

माझे नाव केतकी विजयानंद शहा. मी पुणे येथे संगणक अभियंता म्हणून कार्यरत आहे.

लेखन हा माझा श्वासही आहे अन ध्यासही. हातात लेखणी आली की शब्द कागदावर आपोआप उमटू लागतात. ते शब्द बऱ्याचदा काव्य, कथा, लेख स्वरूपात कागदावर आपले अस्तित्व निर्माण करतात.

मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषेवर देवाच्या कृपेने माझी चांगली पकड असल्याने या सर्व भाषांत लिहिण्याचा माझा प्रयत्न असतो. पण अर्थातच मराठी माझी मायबोली असल्यामुळे माझे जास्तीत जास्त लेखन मराठी मधे आहे.

आजवर असंख्य कविता, गझल, चारोळया, लेख, कथा लिहिण्याचा योग आला. बऱ्याच संकेतस्थळांवर माझे साहित्य उपलब्ध आहे.

ईसाहित्य प्रतिष्ठाण ठाणे यांच्या तर्फे माझी आजवर अबोली, अरुणोदय आणि क्षणभंगूर ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. देवाच्या कृपेने तिन्ही पुस्तकांना रसिक वाचकांचे उदंड प्रेम मिळाले.

एका पत्रलेखन स्पर्धेच्या माध्यमातून माझे तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवाजी महाराजांना सध्याच्या राजकीय आणि सामाजिक भीषण परिस्थितीची कल्पना देण्यासाठी खलिता(पत्र)लिहिण्याचे धाडस केले होते. ते आज असते तर नक्कीच परिस्थिती फार वेगळी असती.

साहित्यमंचाशी जोडलेली असल्यामुळे काव्यसंमेलने, साहित्यमंचाचे कार्यक्रम यात आवर्जुन सहभाग असतो.

लेखनाच्या सोबतीनेच, अथांग पसरलेल्या मराठीच्या साहित्यरुपी समुद्राचे साहित्यमंथन करून दिग्गज साहित्यिकांच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखाली राहण्याचाही प्रयत्न करत असते. बहिणाबाई, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर यांसारख्या साहित्य शिरोमणीं कडून मला बरेच शिकण्यास मिळाले. त्यांच्या साहित्यरूपी वटवृक्षाच्या सावलीत मी लहानाची मोठी झाले.


माझ्या मायबोली मराठीची लेखन आणि वाचन संस्कृती कुठेतरी लोप पावत चालली आहे. तिला वृद्धिंगत करण्यास मी प्रयत्नशील आहे आणि पुढेही कायम असेन.


आपण रसिक वाचकही ती जपण्यास... वृद्धिंगत करण्यास हातभार लावाल अशी आशा करते.


-केतकी शहा

ketakishahtheauthor@gmail.com

- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kshanbhangoor_ketaki_shah.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/arunodaya_ketakee_shah.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/abolee_ketakee_shah.pdf




मौत

अस्वीकरण/ डिसक्लेमर

हि कथा तसेच कथेतील व्यक्ती, पात्रे, स्थळे, संस्था, नावे, वैद्यकीय बाबी, प्रसंग संपूर्ण काल्पनिक आहेत. त्यांचे कोणत्याही जिवीत अथवा मृत व्यक्तींशी तसेच घटनेशी साधर्म्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अर्पणपत्रिका

आयुष्यरूपी समुद्राला अनपेक्षित रित्या आलेल्या भरतीच्या लाटेवर स्वार होऊन, तिला काबीज करून, आपल्या लाडक्या व्यक्तीसाठी त्या परिस्थितीतही तग धरून, चिरंतन राहणाऱ्या सर्व जीवाभावाच्या नात्यांना अर्पण.

-केतकी शहा

# प्रकरण १

“चिरंतन लाईफ केअर” हॉस्पिटलच्या आवारात उदघाटन समारोहाची बरीच गडबड चालू होती. आजच्या समारोहासाठी बरीच गर्दी जमली होती. रेवती आणि प्रतीक तर आजच्या दिवसासाठी खूप उत्साही होते. दोघांनीही या प्रकल्पासाठी खूप मेहनत घेतली होती. गेले कित्येक महिने त्यांना या हॉस्पिटलच्या ध्येयाने पछाडले होते. "ध्यास" संस्थेशी संलग्न होऊन, बरीच धावपळ तसेच अनेक आर्थिक व कायदेशीर अडचणींवर मात करत त्यांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेला होता.

असे असले तरीही या मंगलप्रसंगी देखील सुहासच्या आई-बाबांच्या, प्रतीकच्या आणि रेवतीच्या मनात मात्र संमिश्र भावनांचा लपंडाव सुरु होता.

"ध्यास" संस्थेचे अध्यक्ष आणि सुहासच्या आई-बाबांच्या हस्ते हा उदघाटन सोहळा पार पडणार होता. पण त्यांनी हॉस्पिटलचा मूळ उद्देश ध्यानात घेऊन, उदघाटन सोहळयासाठी त्यांच्या सोबतीने एका कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णाचीही निवड केली होती. तो रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त होता.

सुहासच्या आई-बाबांच्या हस्ते उदघाटन करायचे असे रेवती आणि प्रतीकने अगदी सुरवातीलाच, प्रकल्पाच्या पायाभरणी समारोहालाच निश्चित केले होते. आणि तेच योग्य देखील होते. हॉस्पिटलचा मूळ उद्देश कितीही सामाजिक असला तरी तेथील उपस्थितांच्या आणि खास करून रेवती, प्रतीक, सुहासच्या आई-बाबांच्या भावनिक पातळीशी एका अर्थाने नाळ जोडणारा होता. तो जितका सामाजिक होता तितकाच भावनिक देखील.

रेवती, प्रतीक आणि "ध्यास" च्या अथक प्रयत्नानंतर आजचा हा सोनियाचा दिवस उगवला होता.

"ध्यास" संस्थेचे अध्यक्ष आणि सुहासच्या आई-बाबांनी त्या रुग्णासोबत रिबन कापून “चिरंतन लाईफ केअर” हॉस्पिटलचे उदघाटन केले. चारी बाजूने टाळयांचा वर्षाव झाला. या आनंदाच्या क्षणीही सुहासच्या आई-बाबांच्या आणि रेवतीच्या डोळयांच्या कडा भिजल्यावाचून राहिल्या नाही.

आप्तस्वकीयांच्या डोळयांतील या अमृतवर्षावाने आजच्या दिवसावर मांगल्याचे शिंपण केले होते.

“चिरंतन लाईफ केअर” हॉस्पिटलच्या निर्मितीचा पाया रेवतीच्या मनात ज्या घटनेमुळे रचला गेला त्या घटनेची किंमत, त्या घटनेचे मूल्य फक्त हेच लोक समजू शकत होते.

उदघाटन झाले.

त्यानांतर सर्वप्रथम कर्करोगाने ग्रस्त असलेल्या त्या रुग्णाला, त्याच्यासाठी राखून ठेवलेल्या अत्याधुनिक सुखसोयींनीयुक्त अश्या खोलीमधे नेण्यात आले. डॉक्टरांची फौज त्याच्या दिमतीला हजर होती.

त्याच्या मेडिकल हिस्टरीचा अभ्यास डॉक्टरांनी आधीच केला होता. त्यामुळे ते त्याच्या पुढील उपचारांसाठी सज्ज होते. त्याच्या संपूर्ण इलाजाची जबाबदारी हॉस्पिटलने उचलली होती.

इतर लोक हॉस्पिटलमधे प्रवेश करून एकंदरीत सोयी सुविधांचा आढावा घेत होते. त्यावर चर्चा, मते यांची मैफल जमली.

रेवतीला मात्र हॉस्पिटलच्या आवारात पाय ठेवल्या पासूनच सुहासचे अस्तित्व जाणवू लागले होते. तो कदाचित तिच्या आजूबाजूलाच वावरत असावा.

किंबहुना अजूनही तो तिच्याच अस्तित्वाचा एक अविभाज्य भाग असल्याचा तिथे पुनरुच्चार होत होता.

खरेतर तोच प्रेरणास्रोत होता या सगळ्यांचा.

प्रेरणास्रोत.!!

विचार करत करत, एक एक पाऊल पुढे टाकत, रेवती अलवार भूतकाळाच्या कुशीत शिरली.

प्रकरण २

रेवती त्यांच्या नेहमीच्या ठरलेल्या बसथांब्यावर नेहमी प्रमाणे, नेहमीच्या वेळेवर त्याची वाट पाहत उभी होती. ती स्वताःशीच कुजबुजत होती. "अजुन कसा आला नाही बरे हा! एरवी तर वेळेच्या पाच मिनिटं आधीच हजर असतो".

५-१०-१५. घडयाळाचे काटे पुढे सरकत आपल्यासोबत वेळेलाही पुढे नेत होते. नेहमीची वेळ उलटून आता पंधरा मिनिटं होऊन गेली होती तरीही या मुलाचा काही पत्ता नव्हता.

रेवतीने बॅगेतून मोबाईल काढला आणि त्याला फोन लावू लागली. पण फोन संपर्क क्षेत्राबाहेर होता. तिला वाटले गाडी चालवत असेल किंवा रेंज नसेल. कदाचित पोहोचतच असावा इतक्यात. म्हणून ती तशीच परत वाट पाहत उभी राहिली. अर्धा तास झाला तरी सुहासचा काही पत्ता नव्हता.

तिच्या डोक्यात आले की प्रतीकला फोन करून विचारावे. निदान त्याला तरी माहित असेलच सुहासला उशीर का होतोय.

प्रतीकचा फोन वाजत होता. पण उचलला गेला नाही.

आता मात्र रेवतीचा जीव घाबरा घुबरा होऊ लागला. तिने सुहासला परत एकदा फोन लावण्याचा निष्फळ प्रयत्न केला. काही कळण्यास मार्ग नव्हता.

"हा मुलगा आहे तरी कुठे? ही काय पद्धत असते का. आजकालच्या धकाधकीच्या शहरी जीवनात मोबाईलचे अनन्यसाधारण महत्व आहे. एक फोन किंवा साधा मेसेज तरी करायला हवा होता याने. मी याला फोन लावण्याचा प्रयत्न करत आहे. पण तोही लागत नाहीय. मोबाईलचे एवढे विकसित तंत्रज्ञान हाताशी असून काय उपयोग?"

विचार विचार आणि फक्त विचार.

एक तासाच्या वर होऊन गेला होता. आता मात्र रेवतीला रडू येऊ लागले. तिला कळेना सुहासला संपर्क कसा करावा. तो सुखरूप तर असेल ना. अपघात वगैरे? छे छे असे काही नसेल. म्हणतात ना "मन चिंती ते वैरी ही न चिंती".

पण या मुलाला संपर्क करायचा तरी कसा. विचार करत करतच तिच्या डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या.

आता इथे थांबण्यात काही अर्थ नाही हे तिला कळून चुकले होते. तिने स्वतःला सावरले, चेहरा नीट केला आणि तशीच परत हॉस्टेलवर आली. पण काही केल्या तिला चैन पडेना.

या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी रेवतीने स्वतःला थोडा वेळ द्यायचे ठरवले. ती थोडावेळ शांत बसून राहिली.

थोडी शांत झाल्यावर आता पुढे काय करता येईल याचा ती विचार करू लागली. तिने परत एकदा दोघांना फोन लावायचे ठरविले.  सुहासचा फोन आताही लागला नाही. तिने परत एकदा नंबर डायल केला. प्रतीकने यावेळेस फोन उचलला.

त्याने तिला जे सांगितले ते ऐकून बोलत बोलतच ती घेरी येऊन पडली. प्रतीक तिकडून हॅलो हॅलो म्हणत राहिला.

रेवतीला तिच्या मैत्रिणींनी चेहऱ्यावर पाण्याचा शिडकावा करून जागे केले. ती जागी झाली तसे तिला प्रतीकचे शब्द आठवले.

तिने स्वतःला सावरले आणि ती हॉस्टेल मधून बाहेर पडली ते थेट संजीवनी हॉस्पिटलमधे गेली.

सुहास बेडवर झोपला होता. त्याला तसे पाहून रेवतीला खूप कसे तरी होऊ लागले. प्रतीक त्याच्या उशाशी बसला होता. रेवतीला पाहताच तो उठला. ती सुहास जवळ जाऊन बसली.

सुहास अजुनही बेशुद्ध होता. शरीरावर जागोजागी चाकूचे वार असल्याने त्यांना बँडेजच्या साहाय्याने सुरक्षित करण्यात आले होते. नशीब तरी थोडक्यावर निभावले होते. तिला ती अवस्था पाहून कसेतरीच झाले. पण आपण हॉस्पिटलमधे आहोत हे लक्षात येऊन तिने स्वतःला सावरले.

तिने प्रतीक कडून घडलेल्या प्रकाराबद्दल  इत्थंभूत माहिती जाणून घेतली. त्याने सर्व प्रसंग वर्णन करून सांगितला.

प्रकरण ३

“लोक कसे काय दुसऱ्याचा विचार करत नाहीत देव जाणे. दुसऱ्या व्यक्तीवर दिवसाढवळया चाकूने वार करतात म्हणजे काय. आणि का तर तो त्या जमावातील भडकलेल्या लोकांना शांत करायचा प्रयत्न करत होता म्हणून. कमालच आहे. याला लोकशाही म्हणावे कि स्वैराचार?” असा विचार तिच्या डोक्यात आला आणि तिने तो प्रतीकला बोलूनही दाखवला.

त्यांचे बोलणे सुरु असतानाच डॉक्टर राऊंड साठी आले. रेवती बेडपासून दूर जाऊन उभी राहिली.

डॉक्टरांच्या हालचालींवरून आणि साधारण त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावांवरून परिस्थितीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करत ती उभी होती.

प्रतीकने डॉक्टरांना सुहासच्या  तब्येतीविषयी विचारले. अजून साधारण किती दिवस त्याला हॉस्पिटलमधे राहावे लागेल, खाण्या-पिण्याचे पथ्य, गोळया-औषधे यांची सगळी चौकशी केली. त्याला काय चालेल आणि काय नाही हे माहित नसल्यामुळे तो मघाशी फक्त फळे आणि नारळपाणी घेऊन आला होता. तो डॉक्टरांशी बोलत बोलतच बाहेर गेला.

रेवती परत बेडजवळ आली. ती सुहासकडे एकटक बघत होती. हालत फारच खराब होती. त्याच्या डोक्यावरून हात फिरवावा असे तिच्या मनात आले होते. तिने स्वतःला आवरले, पण तिला हुंदका मात्र आवरता आला नाही.

तितक्यात तिला पावलांचा आवाज आला. तिने डोळयांच्या कडा पुसल्या. प्रतीक डॉक्टरांशी बोलून परत आला होता.

सोबत परत एकदा डॉक्टर आणि त्यांच्या जोडीला यावेळी पोलिसही होते.

अर्थातच ही पोलीस केस होती. जरी प्रतीकने काय झाले ते पोलिसांना आधीच सांगितले होते, तरी पोलिसांना सुहासकडूनही काय व कसे घडले ते ऐकायचे होते. सुहास शुद्धीवर येण्याची जसे सगळे वाट पाहत होते तसे पोलिसही पाहत होते.

पोलीस आणि डॉक्टर बोलत बोलत बाहेर निघून गेले.

प्रतीक परत आल्यावर रेवतीने त्याला त्याच्या आई-बाबांना कळवलेस का विचारले. प्रतीकने सांगितले ते निघाले आहेत, पोहोचतीलच इतक्यात.

रेवतीला बरे वाटले की सुहासची काळजी घ्यायला त्याचे आई-बाबा असतील. तसे ही त्यांनी त्यांच्या नात्याबद्दल अजुन दोघांच्या ही घरी सांगितले नव्हते. म्हणून तिला कितीही वाटले तरी ती हॉस्पिटलमधे राहू शकत नव्हती. ते येण्यापूर्वी तिला निघणे भाग होते.

प्रतीकला सुहासची काळजी घेण्यास सांगून, एमर्जेन्सी आली तर कळव आणि तब्बेतिबद्दल वरचेवर कळवत राहा असे सांगून... सुन्न अंतःकरणाने आणि जड

पावलांनी, सुहासला परत एकदा वळून बघत, डोळयांच्या कडा भिजवीत रेवती हॉस्टेलवर येण्यास निघाली.

हॉस्टेल वर पोहोचली तरी तिचे सगळे लक्ष सुहासकडेच होते.

त्याला शुद्ध आली असेल का? त्याने काही खाल्ले असेल का? त्याचे आई-बाबा आले असतील का?

एक ना अनेक विचार तिच्या डोक्यात घोळत होते.

## प्रकरण ४

तिन्हीसांजेची किनार क्षितिजावर अवतरली होती. निशा जणू काही तिमिराच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत अधिकच गडद होण्याच्या दिशेने प्रवास करू लागली होती.

रेवती तशीच विचार करत करत बेड वर पडून होती. तिने काहीही खाल्लेले नव्हते. जुई तिला उठून काही तरी खाऊन घे म्हणून सांगत होती. चल जरा चक्कर मारुन येऊ म्हणजे तुला बरे वाटेल म्हणाली. पण रेवतीला कसालाच उत्साह नव्हता. ती पडल्या पडल्या फक्त एकटक मोबाईल कडे बघत होती.

जुईने तिला थोडे हलवल्यावर ती कशीबशी बेडवर उठून बसली. थोडावेळ तशीच डोळे बंद करून बेडवर बसून राहिली. नंतर दोन्ही हात लांबवून एक मोठा आळस दिला.

घड्याळावर एक नजर टाकली. बेडवरुन उतरून बेसिन जवळ गेली. चेहऱ्यावर पाण्याचे ३-४ सपकारे मारले. तेवढ्यात तिचा फोन वाजला. सुहास शुद्धीवर आला होता.

रेवतीला फार बरे वाटले. मनावरची मरगळ काही अंशी तरी कमी झाली.

त्याचे आई-बाबा पण आले आहेत हे ऐकून रेवतीची काळजी बऱ्यापैकी कमी झाली.

तिला सुहासला भेटण्याची खूप इच्छा होती. पण हॉस्पिटलमधे तिला जाता येत नव्हते. म्हणून तिने प्रतीकला सांगून ठेवले होते की तू उद्या गेलास तर त्याला फोन लावून दे म्हणजे मला बोलता येईल त्याच्याशी.

इकडे हॉस्पिटलमधे सुहासची नजर शुद्ध आल्या पासून रेवतीलाच शोधत होती. प्रतीक कडे त्याने प्रश्नार्थक नजरेने पहिले. तेव्हा प्रतीकने डोळयांनेच रेवती येऊन भेटून गेल्याचे खुणावले. मग तो थोडा शांत झाला.

पण तरीही त्याला या घडीला आपल्या रेवाला पाहण्याची प्रबळ इच्छा झाली होती. त्याने आपल्या या इच्छेला तूर्तास तरी मनातच दाबले.

विचार करत करतच थोड्या वेळात त्याचा डोळा लागला.

दिवस आपल्या वेगाने सरत होते.

सुहासच्या ओढवलेल्या त्या अपघाताला... छे छे, अपघात कसला. घातपाताच्या प्रयत्नाला म्हणा ना... आता एक महिना होत आला होता.

सुहास आता बऱ्यापैकी हिंडू-फिरू लागला होता. त्याचे आई-बाबा त्याला घरी. त्यांच्या मूळगावी नगरला घेऊन आले होते. इकडे नगरला आई-बाबा त्याची चांगली काळजी घेऊ शकत होते.

तिकडे पुण्यात त्याची काळजी कोण घेणार.

पुणे या शहराशी तसा त्यांचा दुरान्वयेही संबंध नव्हता. पुणे हे त्यांच्या कौटुंबिक नकाशावर अवतरले ते सुहासच्या तेथील वास्तव्यामुळे.

सुहास पुण्याहून नगरला निघण्यापूर्वी रेवतीला त्याला भेटता ही आले नव्हते. ते दोघे केवळ फोनवरच संपर्कात होते. सुहास दिवसभर फोनवर लागलेला असायचा. आईच्या अनुभवी नजरेतून हे सुटलेले नव्हते.

एकदा सुहासचे बाबा घरात नसताना तिने हळूच त्याच्या जवळ विषय काढला होता. सुहासने उडवा-उडवीचे उत्तर देऊन विषय टाळला होता.

बऱ्याच काळानंतर सुहासची प्रकृती मूळपदावर येत होती.

## प्रकरण ५

सुहास पूर्ण बरा होऊन पुण्याला परत आला. त्याने पहिली रूमवर बॅग ठेवली नि तडक रिक्षा करून रेवतीला भेटायला गेला.

काहीही न कळवता सुहास अचानक रेवतीच्या समोर आला होता. रेवतीचा स्वतःच्या डोळयांवर विश्वासच बसत नव्हता. भास कि सत्य याचा उलगडा व्हायला तिला बराच वेळ लागला.

नंतर तोच समोर असल्याचे लक्षात येऊन रेवतीचा आनंद गगनात मावत नव्हता.

काय करू आणि काय नको असे तिला झाले होते.

दोघांनी मनसोक्त गप्पा मारल्या. बाहेरच जेवण केले. सारसबगेच्या गणपतीला जाऊन आले. रेवतीने मनोमन गणपती बाप्पाचे आभार मानले.

रेवतीला सुहास भेटल्या पासून आपल्यातही पुन्हा नव्याने प्राण संचारल्या सारखे वाटू लागले. जगण्यातला पूर्वीचाच उत्साह परत आला होता.

सुहास ऑफीसला जाऊ लागला. सगळे सुरळीत सुरू झाले. सगळे छान चालू होते. अगदी पूर्वी सुरु होते तसेच.

किंबहुना या काळातील दुराव्याने त्यांचे प्रेम अधिक दृढ झाले होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

नेहमीप्रमाणे काम, फिरणे, सिनेमा, गप्पा गोष्टी आणि भविष्यातील सुखावणारी स्वप्ने...

दोघेही आपल्या प्रेमरूपी प्राजक्त फुलांच्या सड्यात न्हाऊन, दरवळून निघत होते.

काळ आपल्या गतीने पुढे चालत होता.

पण काळाच्या पोटात काय दडले आहे हे कोणी सांगू शकले आहे का आजवर!

रेवतीला काही तरी बदल जाणवत होता हल्ली सुहास मधे. काय तो तिला नीटसा कळत नव्हता. पण काही तरी होते जे त्याला आपल्याला सांगायचे आहे किंवा तो काही तरी लपवतो आहे असे तिला वाटत होते. हल्ली रेवतीने भेटायला बोलावल्यावर ही तो कारणे देऊ लागला होता हे देखील रेवतीच्या लक्षात आले होते.

काय बरे असेल. तिला काही समजत नव्हते. पण पाणी कुठे तरी मुरत होते एवढे नक्की.

नक्की कुठे? ते शोधून काढण्याची गरज होती.

## प्रकरण ६

रेवतीला सुहासच्या वागण्यातील बदल जाणवू लागले होते पण कारण तिच्या लक्षात येत नव्हते.

आपले काही चुकले का? आपण अनावधानाने सुहासला कधी दुखावले का? काही काही कळण्यास मार्ग नव्हता. या घडीला तरी तिला हे सगळेच तिच्या आकलना पलिकडचे वाटत होते.

पण हे मुरणारे पाणी कोणत्या प्रवाहाला जाऊन मिळत आहे, प्रवाहाचा वेग मंदावला आहे की प्रवाहाने त्याची दिशाच बदलली आहे याचा छडा लावायचा चंगच रेवतीने बांधला होता.

ती फार अस्वस्थ झाली होती की काहीतरी असे आहे जे सुहास आपल्या पासून लपवत आहे आणि ज्यामुळे तो आपल्याला टाळत आहे.

एवढ्या सुंदर कणाकणाने बहरलेल्या नात्याची रेशमी वीण एवढ्यात उसवायला सुरुवात तर झाली नसेल ना! अचानक रेवतीच्या मनात विचार चमकून गेला.

ती बेडवर उशीला टेकून बसली होती. तिला आणखी अस्वस्थ वाटू लागले.

तिने एक उसासा टाकत डोळयांच्या पापण्या अलगद मिटल्या. डोळयांत जमा झालेल्या पाण्यासोबत भूतकाळ बंद पापण्यांआडून डोकावू पाहत होता.

रेवती आणि तिच्या कॉलेजच्या मैत्रिणी शॉपिंग करून दंगा मस्ती करत मॉल मधून बाहेर पडत असताना मॉलमधील एका वळणावर जोरात एका मुलाला धडकल्या.

ती आणि तिच्या मैत्रिणी त्याच्या जोरदार धक्क्याने जमिनीवर फेकल्या गेल्या. आणि एकावर एक पाठीवर पडल्या. रेवती त्यांच्यात सर्वात मागे असल्याने तिच्या दोघी मैत्रिणी तिच्या अंगावर पडल्या होत्या. हातातील शॉपिंग बॅग्स जमिनीवर इतस्ततः पसरल्या गेल्या.

हे सगळे अगदी काही क्षणांतच घडले असल्या कारणाने काय घडले हे सर्वांच्याच लक्षात यायला वेळ लागला.

त्या मुलाने, सुहासने पटकन हात देत आधी वरील दोघींना उठवले. अचानक भार अंगावर आल्याने रेवतीची हालत खराब झाली होती. तिला धड उठताही येत नव्हते. पायाला मुंग्या आल्या होत्या.

त्रासिक भाव असून देखील तेजस्वी वाटणारा तिचा चेहरा. वाऱ्याच्या झुळुकीने तिच्या चेहऱ्याशी खेळणारे काळेभोर केस. अँकल लेंथ जीन्स आणि “DARE NOT TO” हि अक्षरे लिहलेला टी शर्ट…

टी शर्ट वरील अक्षरे पाहून सुहास मदतीसाठी पुढे केलेला हात मागे घेण्याच्या तयारीत होता. पण तोपर्यंत रेवतीनेच आधार घेण्यासाठी त्याचा हात पकडला होता.

सुहासने तिला हात देऊन उभे केले. तिला उठवताना तिच्या परफ्यूमचा सुगंध सुहासजवळ पोहोचला. आणि सोबत तिच्या हातांचा तो रेशमी स्पर्श.

सुहास काही क्षण संमोहित झाला होता.

खरे पाहायला गेले तर त्याची काही चूक नव्हती. रेवती आणि तिच्या मैत्रिणीच मस्ती करत चालल्या होत्या. समोर पाहण्याचे भानही त्यांना उरले नव्हते.

पण तरीही सौजन्यापोटी सुहासने त्यांची माफी मागितली.

रेवती आणि तिच्या मैत्रिणींच्या ध्यानात आपली चूक, उशीराने का होईना आली. त्यांनी सुहासचे आभार मानले.

प्रकरण ७

त्यानंतर विचित्र योगायोगांची एक शृंखला सुरू झाली. वारंवार त्यांच्या बऱ्याच भेटी झाल्या. कधी सीसीडी, कधी हॉटेल, कधी पेड पार्किंग...

आणि त्यादिवशी तर सारसबागेच्या गणपतीच्या दरबारी.

रेवतीला हा काही दैवी संकेत आहे का असे वाटत होते.

मंदिरातच सुहासने प्रसन्न चेहऱ्याने स्वतःची ओळख करून दिली. या आधीच्या प्रत्येक भेटीत एकमेकांकडे फक्त कटाक्ष आणि एक ऑकवर्ड असे हसू होते.

रेवतीने ही आपली ओळख करून दिली.

त्या दिवशी मॉल मधे रेवतीने सुहासला फार काही निरखून पहिले नव्हते.

आज मंदिरात तिचे त्याच्याकडे लक्ष गेले.

मध्यम उंचीचा. गोरापान आणि घारे डोळे. पण त्याची शब्दफेक, मधे मधे घेत असलेले पॉझेस आणि त्याचे हसणे जास्त आकर्षक होते.

रेवतीच्या मनात संकेत ठळक बसला. सुहासला इतक्या वेळेस आपल्यासमोर आणण्यामागे गणपती बाप्पाचे काय प्रयोजन असावे? रेवतीचे मन सुहासचा पाठपुरावा करत होते.

हळूहळू मैत्री, फोन नंबरची देवाणघेवाण, फोनवर बोलणे...

एकमेकांच्या व्यक्तिमत्वाचे न उलगडलेले पैलू अलवार उलगडले जात होते.

मनात प्रेमांकुर फुटू लागला होता. पण पुढाकार कोणीच घेत नव्हते.

रेवती आजच्या काळातील मुलगी होती. मग सुहासानेच प्रपोज करावे या विचारांची ती नव्हती. त्यामुळे ज्या वेळेस तिला योग्य वाटेल तेव्हा तिनेच प्रपोज करायचे ठरवले होते.

त्यानंतर सुहासच्या वाढदिवशी रेवतीने त्याला केलेले प्रपोज, भारावलेला सुहास, त्याच्या होकारानंतरचे सुरुवातीचे अलवार दिवस, हळूहळू फुलत चाललेले नाते, कालांतराने आणि सहवासाने घट्ट झालेली या रेशमी नात्याची वीण.

सगळे रेवतीच्या बंद पापण्यांआड जसेच्या तसे आणि अगदी आज घडल्याप्रमाणे तरळत होते.

अचानक फोनच्या आवाजाने रेवतीची विचारशृंखला खंडित केली. आणि पापण्यांना आपण वर्तमानकाळात परतल्याची जाणीव झाली.

रेवतीच्या आईचा फोन होता. आईशी बोलून तिने फोन ठेवला.

परत तिची विचारशृंखला पूर्ववत झाली. काय झाले असावे सुहासला? की आपणच जरुरीपेक्षा जास्त विचार करत आहोत? विचार करून करून रेवतीचे डोके जड झाले होते.

त्या अवस्थेतच बेडवर पडल्या पडल्या ती झोपेच्या स्वाधीन झाली.

## प्रकरण ८

मोबाईलच्या अलार्मने रेवतीची झोप मोडली. तो बंद करून ती एका कुशीवर झाली. कालचा अस्वस्थपणा बहुधा तिच्या उठण्याची वाट पाहत, उशाशीच ठाण मांडून बसला असावा. ती जागी होताच काही सेकंदातच तो अस्वस्थपणा रेवतीला परत जाणवू लागला.

ती बेडवर उठून बसली. डोके जड वाटत होते तिला. दोन्ही हातांनी केसांना मागे घेऊन क्लच लावले. नंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे तिने दोन्ही हातांचे तळवे एकमेकांवर घासले. त्या निर्माण झालेल्या ऊर्जेचा शेक डोळयांना आणि चेहऱ्याला देत तिने आपल्या नवीन दिवसाची सुरुवात केली.

खिडकीचे पडदे बाजूला करून सूर्याच्या कोवळया किरणांना खोलीत प्रवेश करण्यास तिने वाट मोकळी करून दिली. खिडकीची काच उघडली तसा सकाळचा प्रदूषणविरहित मंद वारा खिडकीच्या पडद्यांशी खेळू लागला. वाऱ्याची अलवार झुळूक रेवतीच्या चेहऱ्यावर आली. ती झुळूक तिच्यासोबत बागेतील मोगऱ्याचा सुगंध घेऊन आली. समोरच्या बंगल्याच्या अंगणात पारिजातकाच्या फुलांचा सडा पडलेला दिसत होता.

पक्षांची मधुर किलबिल त्या वातावरणाला पार्श्वसंगीत देत असल्याचा भास रेवतीला होत होता. त्यांची दिनचर्या सुरू झाल्याने निरभ्र आकाशात त्यांचे थवेच्या थवे भरारी घेत असलेले दिसत होते. निरनिराळया रंगांचे, आकारांचे पक्षी. पण सगळयांचा आकाशाला गवसणी घालण्याचा उत्साह तोच. कुठून बळ येत असेल या चिमुरड्यांच्या पंखात!

रेवतीला काही क्षणांच्या त्या निसर्गरम्य आल्हाददायक सफरीने प्रसन्न वाटले.

मनाची मरगळ आणि अस्वस्थपणा झटकून टाकण्याच्या दिशेने दिवसाची सुरुवात तरी अतिशय उत्तम झाली होती.

रेवती निसर्गाशी समरस होऊन स्वतःशीच विचार करत होती.

प्रत्येक नवीन दिवस हा नवीन आशा, नवीन आकांक्षांना संपूर्ण निरभ्र आकाश बहाल करत असतो.

त्या आकाशातील नको असलेले ढग बाजूला सारून, ते आकाश पुन्हा नव्या तारे तारकांनी सजवण्याचे काम ज्याचे त्याने करायचे असते.

त्याच आकाशात तिला तिचा ध्रुवतारा काहीसा विस्थापित झाल्यासारखे वाटत होते.

...तसे होण्यामागचे कारण शोधायचे होते.

तिने मनाशी काहीतरी ठरविले. हसऱ्या चेहऱ्याने बाथरूमकडे गेली. रेवती तयार होऊन प्रसन्न चित्ताने हॉस्टेलमधून बाहेर पडली.

## प्रकरण ९

रेवती मनाशी काहितरी ठरवून घरातून बाहेर पडली होती. तिने आज प्रतीकला या सर्व प्रकाराबद्दल विश्वासात घेण्याचे ठरविले होते.

त्या घातपाताच्या प्रसंगानंतर किती सुखद काळ तिने सुहास सोबत घालवला होता. लग्नाची सुखद स्वप्ने रंगविली होती.

मग आत्ता सुहासला नेमके काय सलत आहे हे प्रतीकला नक्की ठाऊक असणार. आपल्या मित्राजवळ तरी सुहासने नक्की आपले मन मोकळे केले असणार. आणि त्यामुळेच त्याच्याशी बोलूनच पुढे काय करायचे ते आपल्याला ठरविता येईल असे रेवतीला वाटत होते.

ती प्रतीकला कोणतीही पूर्वसूचना न देता त्याच्या कॉलेज मधे भेटायला आली होती. प्रतीक कॉलेजमधे प्रोफेसर म्हणून कार्यरत होता.

रेवतीने प्रतीकला फोन लावला. पण पलीकडून कोणताच रिस्पॉन्स आला नाही. कदाचित तो लेक्चर मधे असण्याची शक्यता होती.

रेवती, नंतर कॉलेज मधे दाखल झाली आणि प्रतीकची चौकशी केली. त्याचे लेक्चर सुटायला अजून अर्धा तास शिल्लक होता.

तिच्याकडे वाट पाहण्याशिवाय काही पर्याय नव्हता. ती तिथेच कॉरिडॉर मधे प्रतीकची वाट पाहत थांबली.

बरोबर ४० मिनिटांनी तो समोरून येताना दिसला.

त्याने फोन बघितला नसल्याने तो रेवतीला अचानक समोर पाहून आश्चर्यचकित झाला. थोडा थबकला.

"रेवती अचानक इथे कशी? मला भेटायला आली असेल की तिचे इतर काही काम असेल? "

त्याने विचार करत करतच खिशातून मोबाईल बाहेर काढला. रेवतीचा मिस्ड कॉल होता.

"म्हणजे रेवती मलाच भेटायला आली आहे तर. काय काम असेल तिचे माझ्याकडे..."

प्रतीक विचार करत असतानाच रेवती त्याच्याजवळ आली.

प्रतीक रेवतीला कँटीन मधे घेऊन गेला.

रेवतीने सरळ विषयलाच हात घातला. पण प्रतीकने आपलीही सुहासाशी इतक्यात भेट झाली नसल्याचे सांगितले.

“सुहास हल्ली माझ्याशीही तुटक तुटकच वागत आहे. भेटायला बोलावले तर भेटीपेक्षा ती टाळण्याकडे त्याचा कल जास्त असतो. त्याचे हल्ली नक्की काय चालू आहे काही कळण्यास मार्ग नाही” प्रतीक

प्रतीक बोलताना चाचरल्या सारखा रेवतीला जाणवले.

म्हणजे प्रतीकही काहीतरी लपवत असावा का? रेवती विचार करत सुन्न अंतःकरणाने हॉस्टेल वर परतली.

प्रकरण १०

"प्रतीकला खरंच काही माहीत नाही की तो आपल्यापासून काहीतरी लपवण्याचा प्रयत्न करत आहे? पण नेमके काय?

तो बोलताना चाचरत का होता? असे काय असावे की तो प्रतीक जो सुहास चुकल्यावर त्याचे कान पिळायलाही मागेपुढे पाहायचा नाही, जो आपल्याला नेहमी आधार द्यायचा, भांडणात बऱ्याचदा मध्यस्थी करायचा... तो ही आपल्या मित्राच्या बाजूने त्याच्या लपवाछपवीत सामील असावा. काय चालू काय आहे नक्की या दोघांचे...?"

रेवतीला काही सुचत नव्हते. प्रतीकची आणि तिची पहिली भेट तिला आठवली. सुहासने त्या दोघांची एकमेकांशी ओळख करून दिली होती. अगदी मोघम पाच मिनिटं बोलणं झाले असेल त्या वेळेस.

पण त्यानंतर हळूहळू प्रत्येक भेटीगणिक प्रतीकशी वाढत गेलेली रेवतीची मैत्री. तिला प्रतीकमुळे निखळ आणि निस्वार्थ मैत्रीचा प्रत्यय आला होता. त्यांची

निखळ मैत्री वरचेवर इतकी घट्ट झाली की नंतर नंतर तर रेवती हे देखील विसरली होती की आधी तो सुहासचा मित्र होता आणि मग तिचा.

ती अगदी सहजगत्या त्याच्या जवळ आपले मन मोकळे करायची. अगदी सुहासची तक्रार देखील ती हक्काने, अगदी लीलया त्याच्याकडे करू शकत होती. वेळ पडली तर प्रतीक सुहासचा कान पिळायला पण कमी करायचा नाही. रेवतीला ही बऱ्याचदा तिच्या चुका निदर्शनास आणून द्यायचा तो. त्याच्या वागण्यात आणि विचारांत अतिशय पारदर्शी होता तो.

पण मग आज प्रतीकला काय झाले होते... पारदर्शकते वर हे कसल्या धुक्याचे आवरण...?

त्याच्या अश्या वागण्यामागे नक्की काय कारण असेल? आणि तो मला खरे का सांगू शकत नसावा? किंवा सत्य बोलण्यापासून काय अडवत असेल त्याला...

प्रश्न प्रश्न आणि फक्त प्रश्न. उत्तर कशाचेच मिळत नव्हते.

बरेच दिवस असेच चालू होते. विचारांची गर्दी आणि त्या गर्दीतून वाट शोधू पाहणारी, त्या वाटेच्या दिशेने प्रयत्न करत करत चाचपडणारी रेवती. रेवतीची आशा दिवसेंदिवस धूसर होत चालली होती.

आपल्या आणि सुहासमधे आजवर जे काही होते ते सगळे संपत चालले आहे किंवा एव्हाना संपले आहे का असे विचार तिच्या डोक्यात येत होते.

तिने ठरविले होते आज काही झाले तरी या परिस्थितून स्वतःला बाहेर काढायचे.

# प्रकरण ११

थोडे त्या विचारांच्या चक्रव्यूहातून बाहेर पडता यावे म्हणून, डोक्याला विश्रांती मिळावी म्हणून, नकारात्मक विचारांना बाजूला सारून.. नवीन सकारात्मक विचारांना वाट मोकळी करून देता यावी म्हणून रेवतीने गाडीवरून मनसोक्त फेरफटका, शॉपिंग, चटपटीत खाणे, भरपूर सेल्फीज... अगदी मनाला हवा तसा, हवे ते करत, वेळ खर्च केला.

तिला काही अंशी तरी मनावरचा ताण तसेच विचारांवर चढलेली मरगळ दूर झाल्यासारखे वाटत होते.

ती घरी परतीच्या प्रवासाला निघाली आणि तिचे मन दुसऱ्या बाजूचा विचार करण्याचा कौल देऊ लागले.

"आपण फक्त आपलाच विचार करत आहोत? नाण्याची दुसरी बाजू तर आपल्याला माहितीच नाही.

ती जाणून घेण्याचा प्रयत्न आपण केला पण त्यात यश आले नाही.

पुन्हा नव्याने प्रयत्न करण्याची गरज आहे."

ती मनाशी हाच विचार करत दुचाकीवरून जात असतानाच तिची नजर रस्त्याच्या विरुद्ध बाजूला गेली.

तिला सुहास आणि प्रतीक दुचाकीवरून विरुद्ध दिशेकडे जाताना दिसले.

रेवतीला काही समजायच्या आतच तिची गाडी विरुद्ध दिशेला वळलेली होती. मनात तेच विचार नव्या जोमाने सुरू असल्यामुळे, तिच्या नकळतच ही कृती घडली होती.

पण दुचाकीवरून जाण्यात धोका होता. म्हणून रेवतीने गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या पार्किंग झोन मधे पार्क केली. आणि समोरून येणाऱ्या रिक्षाला हात केला. तिने रिक्षा वाल्याला त्या दुचाकीचा पाठलाग करायला सांगितला.

रेवतीची दुचाकी सुहास आणि प्रतीक दोघेही ओळखत होते. म्हणून सत्य उलगडण्यासाठी समोरून चालून आलेली सुवर्णसंधी तिला गमवायची नव्हती. त्यामुळे तिने रिक्षाने जाण्याचा निर्णय घेतला.

रिक्षावाल्याला तिने दुचाकीपासून एक सुरक्षित अंतर ठेवून तिचा पाठलाग करायला सांगितले होते.

पुढे नक्की काय वाढून ठेवले आहे या विचाराने रेवतीचे हातपाय थरथरत होते.

## प्रकरण १२

रेवतीची रिक्षा एक स्थिर सुरक्षित अंतर ठेवून सुहास आणि प्रतीकच्या दुचाकीचा पाठलाग करत होती.

अंतर कापले जात होते खरे पण रेवती जागीच थिजल्या सारखी झाली होती. रेवतीचे हातपाय थरथरत होते. रिक्षात बसल्या बसल्या विचारांच्या आहारी जाऊन ती आपल्या नखांचे चर्वण करत होती. मधेच दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंतवून हनुवटीला लावत होती. मधेच मोबाईल बघत होती. मधेच रिक्षाच्या पुढच्या काचेतून सुहास आणि प्रतीक यांना घेऊन चाललेली दुचाकी दृष्टीक्षेपात आहे का याची खात्री करत होती.

त्या दोघांना जर कळले की मी त्यांचा पाठलाग करत होते तर काय वाटेल त्यांना.? आपण बरोबर तर करत आहोत ना.?

खरे पाहता ही एक आयती संधीच चालून आली होती रेवतीकडे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. तिने सुहास आणि प्रतीक कडून सत्य परिस्थिती नक्की काय असावी हे काढून घेण्याचा बराच प्रयत्न केला होता. पण तिचे सगळे प्रयत्न फोल

ठरले होते.

आणि आता ही संधी स्वतःहून चालून आली होती म्हणून चांगले वाटत असले तरी आता पुढे काय होणार, कोणत्या सत्याचा उलगडा होणार, का हा सभोवताली पसरलेला संभ्रमाचा काळोख अजूनच गडद होणार या विचाराने ती पार गांगरून गेली होती.

नक्की आपण प्रकाशाच्या दिशेने वाटचाल करत आहोत की मिट्ट काळोखाच्या दिशेने…?

रेवतीला काही कळण्यास मार्ग नव्हता.

पण आता परिणामांची परवा न करता रेवतीने जे होईल त्याला सामोरे जाण्याची मनाची तयारी केली होती.

थोड्याच वेळात बघता बघता दुचाकीने मुख्य रस्ता सोडून डाव्या बाजूला असलेल्या गल्लीमधे वळण घेतले. रेवतीने रिक्षा वाल्याला गल्लीच्या सुरवातीलाच थांबण्यास सांगितले. तिला कोणत्याही परिस्थितीत सुहास आणि प्रतीकला आपण इथे असल्याचे आत्ता कळावे असे वाटत नव्हते. सत्य समोर येण्यासाठी ही जी उरली सुरली आशा होती ना कदाचित ती देखील धुळीला मिळेल.

रेवतीने सुहास आणि प्रतीक स्वार असलेल्या दुचाकीला त्या गल्लीच्या मधोमध स्थित असलेल्या एका मोठ्या इमारतीच्या गेटमधून आत शिरताना पाहिले. तिने थोडे थांबून रिक्षाला त्या इमारतीच्या दिशेने चलण्यास सांगितले.

दुचाकी थांबली होती त्या इमारती जवळ येऊन रिक्षा थांबली.

त्या इमारतीच्या सभोवताली असलेल्या झाडांमुळे गल्लीच्या सुरुवातीला उभे असताना ती इमारत नेमकी कशाची आहे ते रेवतीला ओळखू आले नव्हते.

रेवती अवाक होऊन पाहतच राहिली... ती एका हॉस्पिटलची इमारत होती.

प्रकरण १३

रेवतीच्या मनात नाना तऱ्हेचे विचार येऊ लागले. परत हॉस्पिटल? कोणाला बरे नसेल... काय चालू काय आहे नक्की...?

बराच वेळ ती हॉस्पिटलच्या बाहेर उभी होती. आत जाण्याची तिची खूप इच्छा होती. पण त्या दोघांनी बघितले तर परत प्रॉब्लेम होईल असे वाटून ती तशीच रिक्षाचा आडोसा घेऊन, ते दोघे बाहेर येण्याची वाट पाहत तिथेच उभी राहिली.

जवळ जवळ तासाभराने, रेवतीला ते दोघे हॉस्पिटलमधून बाहेर येताना दिसले. रेवतीने त्यांना बाहेर येताना लांबूनच पाहिले आणि रिक्षाच्या आडूनच त्यांच्या हालचालींचा अंदाज घेण्याचा प्रयत्न सुरू झाला.

सुहासच्या हातात कसली तरी फाईल होती. कसलेतरी रिपोर्ट असावे कदाचित.

रेवतीचा संभ्रम वाढतच चालला होता.

ते दोघे आले तसेच दुचाकीवर स्वार होऊन निघून गेले. रेवती सद्यस्थितीत फक्त आणि फक्त बघत राहण्यापलिकडे काहीच करू शकत नव्हती.

ती अस्वस्थतेला कवटाळुनच, जिथे दुचाकी पार्क केली होती तिथे आली. आणि तिथूनच हॉस्टेलवर गेली.

सुहासला विचारू की प्रतीकला? सुहास काही आपल्याशी नीट बोलेल, नीट काही सांगेल असे वाटत नाही. म्हणजे एकच व्यक्ती उरते जी सत्याचा उलगडा करू शकेल.

प्रतीक... हो तोच सांगू शकेल काय ते. पण त्याच्याशी कुठे आणि कसे बोलावे याचा रेवती विचार करत होती.

तिने त्याला फोन करून भेटायला बोलवायचे ठरवले.

अर्थातच यावेळेस ती काही त्याच्या कॉलेजला जाणार नव्हती.

रेवतीला या संभ्रमाच्या काळोखातून बाहेर पडणे गरजेचे झाले होते. सध्याच्या मनस्थती मधून बाहेर पडण्यासाठी, तिचे प्रतीकशी बोलणे गरजेचे होते. त्याच्याशी बोलणे झाल्याशिवाय ती काही स्वस्थ बसणार नव्हती.

प्रकरण १४

रेवतीचा सध्याच्या मनस्थितीत कोंडमारा होत होता. विचार करून करून तिच्या डोक्याचा भुगा झाला होता.

तिला कळत होते की तिचे प्रतीकशी बोलणे झाल्याशिवाय, या सगळया प्रकरणाचा उलगडा झाल्याशिवाय तिला काही चैन पडणार नाही.

रेवतीने बराच विचार करून. जे होईल त्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवून. आणि हिंमत एकवटून. मनाशी काहीतरी निश्चित केले.

"रेवती, जरा शांतपणे बोल. घाई करू नकोस. प्रकरण तुला वाटले होते त्यापेक्षा वेगळे असण्याची शक्यता नाकारता येत नाही." ती स्वतःशीच संवाद साधत होती.

घडलेल्या प्रसंगांची साधारण मनाशी उजळणी करत करतच तिने प्रतीकला फोन लावला.

"काय म्हणतोयस? कसा आहेस? मला तुला जरा तातडीने भेटायचे आहे"

स्वतःला शांत राहण्यास बजावूनही, एकंदरीत सगळया घटनाक्रमामुळे तिला स्वतःच्या वागण्यावर नियंत्रण ठेवता आले नव्हते.

रेवती एकादमात सगळे बोलून, विचारून मोकळी झाली.

प्रतीकला हे सगळे अनपेक्षित होते.

३-४ सेकंद फोनवर अस्वस्थ शांतता होती. तिचा भंग करण्यासाठी दोघांपैकी कोणीतरी बोलणे गरजेचे होते.

प्रतीक बोलू लागला.

"मी एकदम मजेत. तू कशी आहेस.? मी प्रतीक आहे बरे का... चुकुन सुहास तर समजत नाही आहेस ना मला?" असे म्हणून तो हसला. अस्वस्थता कमी करण्याच्या हेतूने प्रतीकने केलेला छोटासा प्रयत्न होता तो.

पण रेवतीला त्यात अजिबात रस नव्हता. त्यामुळे प्रतीकचा प्रयत्न फोल ठरला होता.

तिने प्रतीकच्या विनोदाकडे साफ दुर्लक्ष केले होते.

तिची सध्याची संभ्रमित अवस्था फक्त सुहास या एकाच गोष्टीच्या अवतीभवती केंद्रित होती... सुहास, त्याचे विक्षिप्त वागणे, हॉस्पिटल... आणि तिला फक्त आणि फक्त सत्य जाणून घ्यायचे होते.

"हा बोल लवकर, कधी आणि कुठे भेटूया?" रेवती

प्रतीकला साधारण अंदाज आला होता की त्याने आणि सुहासने सुरू केलेला हा लपंडावाचा खेळ बहुधा आता संपवण्याची वेळ जवळ येत चालली आहे...

# प्रकरण १५

सुहास आणि त्याने एवढे प्रयत्न करून जाणीवपूर्वक, प्रसंगी वाईटपणा पत्करून रेवतीला या सर्व प्रकरणापासून दूर ठेवले होते.

पण आजचा तिचा फोनवरचा सूर काही निराळाच होता. आणि या वेळेस नाही म्हणण्याचा पर्याय देखील रेवतीने प्रतीक समोर ठेवला नव्हता.

रेवती ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या वेळेच्या आधीच १५ मिनिटं हजर होती. तिला हॉस्टेलवर अजिबात बसवत नव्हते. म्हणून ती तिथून लवकरच निघाली होती.

प्रतीक ठरलेल्या वेळेत बरोबर तिथे पोहोचला.

५ मिनिटं इकडचे तिकडचे बोलून झाल्यावर, प्रतीकने  रेवतीला एवढे तातडीने आणि अचानक भेटायला बोलावण्याचे कारण विचारले. रेवती काही सेकंद त्याच्याकडे बघत होती. प्रतीकने खूप प्रयत्नांति निर्विकार चेहरा ठेवला असला तरी त्याच्याही मनात कालवाकालव सुरूच होती.
रेवतीने थेट विषयालाच हात घातला. तिने प्रतीकला काल घडलेला सगळा प्रकार सांगितला.

"गेल्या काही दिवसांपासून तुमच्या दोघांचे काय चालू आहे हे माझ्या अद्यापही लक्षात आले नसावे असे तुम्हा दोघांना वाटते आहे काय?? तसे तर तुम्हाला दोघांना काल हॉस्पिटलमधे पाहिल्यावर माझी खात्रीच पटली आहे. पण तरीही तुझ्या तोंडून मला सगळे ऐकायचे आहे."

खरेतर रेवती अजूनही संभ्रमात होती. पण अंधारात मारलेला हा बाण अनिश्चिततेचा अंधकार भेदून सत्याच्या वलयाचे लक्ष भेदण्यास सफल होतो का ते तिला पडताळायचे होते. दुसरा काही पर्यायही नव्हता.

"...आणि आपल्या मैत्रीखातर तरी इथून पुढे कमीत कमी तुझ्याकडून मला सत्य कळेल अशी आशा मी बाळगण्यास तुझी काही हरकत नसावी असे मला वाटते प्रतीक. तुला काय वाटते?" रेवती

हॉस्पिटलचे नाव ऐकून प्रतीकच्या निर्विकार चेहऱ्यावर निरनिराळ्या हावभावांनी गर्दी करायला सुरुवात केली.

"हिला कसे माहिती हॉस्पिटल? अरे देवा...!!" प्रतीक

"प्रतीक खरे खरे सांग. माझ्या पासून काहीही लपवू नकोस."

“बोल रे प्रतीक... लवकर बोल...  माझा जीव जातोय इकडे..” रेवती

प्रतीककडे आता कोणताच पर्याय शिल्लक राहिला नव्हता. त्यामुळे त्याने तिला सर्व सांगितले.

ती जोरात ‘काय?’ म्हणत उभी राहिली. तिला आपण पब्लिक प्लेसमधे आहोत याचेही भान राहिले नाही.

तिच्या भावनांचा बांध फुटला होता आणि तिच्याही नकळत डोळयांतून पाण्याचा विसर्ग सुरू झाला होता.

आता तिच्या डोक्यात प्रकाश पडला की सुहास एवढा तुटक का वागत होता. भेटायचे का टाळत होता. काही विचारले तर उडवा उडवीची उत्तरे का देत होता.

तिच्या पायाखालची जमीन सरकल्या सारखी तिला जाणवत होती. ती जागेवर बसल्या बसल्या बधिर झाली होती.

## प्रकरण १६

रेवती नुकत्याच कोसळलेल्या विजेच्या तडाख्याने सैरभैर झाली होती.

प्रतीक थोडा संभ्रमात पडला. “जरा हिला थोडी कल्पना होती तर हिने एवढे लाऊड का रिऍक्ट केले? का आपल्याकडून सत्य जाणून घेण्यासाठी रेवतीने केलेला कावा होता?

...म्हणजे रेवतीला काहीच माहित नव्हते तर. सत्य जाणून घेण्याच्या प्रयत्नांत तिला अखेर यश आले होते.”

प्रतीकला रेवतीची अवस्था पाहून खरे तर काय करावे ते सुचत नव्हते. फार मोठा आघात झाला होता तिच्या मनावर. हेच टाळण्याचा प्रयत्न तो आणि सुहास गेल्या कित्येक दिवसांपासून करत होते.

"हेच टाळायचा मी आणि सुहास प्रयत्न करत होतो. त्याच्यावरही रागवू नकोस. तुला त्रास होऊ नये एवढाच प्रांजळ हेतू होता. सांभाळ स्वतःला. चल निघू या का?" प्रतीक

आघातामुळे प्रतीकचे शब्दही आता तिला ऐकू येईनासे झाले होते. अंगात बळेच अवसान आणून कसेतरी रेवती तिथून बाहेर पडली.

प्रतीक गेल्यावर रेवती तिच्या गाडीजवळच शुन्यात, विचारांच्या गर्तेत हरवलेल्या अवस्थेत उभी होती. खरंतर तिला जे ऐकले त्यावर विश्वास बसत नव्हता. किंबहुना तिला त्यावर विश्वास ठेवायचा नव्हता असे म्हणावे लागेल. तिच्या गाडीच्या शेजारी उभी असलेली गाडी पार्किंग मधून बाहेर काढत असणाऱ्या माणसाने हॉर्न वाजवल्यावर रेवती भानावर आली.

तिला काही केल्या हॉस्टेलवर जाण्याची इच्छा नव्हती. तिला या घडीला थोडीशी मनःशांती आणि निवांतपणा हवा होता.

गाडी तिथेच ठेवून ती फुटपाथवरून चालू लागली. थोडेच अंतर चालल्यावर रेवतीला डाव्या हाताला एक छोटेखानी उद्यान दिसले. तिचे पाय नकळतच उद्यानाकडे वळले.

ती आत जाऊन इकडे तिकडे पाहत होती. बसण्यासाठी निवांत, कमी गर्दीचे ठिकाण शोधत होती.

तिला उद्यानात एका बाजूला बसण्यासाठी दगडी बेंचेस दिसले. तिथे बऱ्यापैकी गर्दी होती. मधे पादचाऱ्यांसाठी राखुन ठेवलेला पादचारी मार्ग होता. फिरायला आलेले बरेच वयस्कर लोक त्या पादचारी मार्गावरून फिरत होते.

तर उद्यानाच्या दुसऱ्या बाजूला हिरवळीने अंथरलेला गालिचा तिच्या नजरेस पडला. तिथे एका बाजूला लहान मुले त्यांच्या पालकांसोबत खेळत होती. त्या लहान मुलांना आपल्याच विश्वात रमलेले पाहून, त्यांना दुडूदुडू धावताना पाहून रेवतीला किंचितसे आल्हाददायक वाटले.

दुसरीकडे एक संपूर्ण हिरवळीचा पट्टा. त्या उद्यानातील इतर ठिकाणांच्या मानाने थोडा रिकामा आणि शांत दिसत होता. तिथे लोकांची जास्त हालचालही नव्हती.

त्या कोपऱ्यात, त्या हिरवळीवर जाऊन रेवती बसली.

समोर पडलेली झाडाची काडी उचलून गवताळ जमिनीवर रेघोट्या मारल्या सारखे करत करत तिचे विचारांचे घोडे परत चौफेर उधळू लागले .

## प्रकरण १७

रेवती चौफेर उधळणाऱ्या विचारांच्या घोड्यांवर स्वार होती. घोडे कदाचित भरकटले असावे. त्यांना योग्य दिशेला नेण्यासाठी सारासार विचार करण्याची गरज होती.

आपण काय विचार करतो आणि खरी परिस्थिती काय असू शकते… आपले विचार आणि सत्य परिस्थिती यात जमीन आसमानाचे अंतर असू शकते. आपल्या विचारांना खरेच आपण किती संकुचित बनवून ठेवतो.

तिला प्रतीकने काय सांगितले यावर विश्वास बसत नव्हता. सुहासच्या मागे जणू साडे सातीच लागली होती.

बरा होऊन फक्त ८ महिने झाले होते आणि परत हे असे. देव एखाद्याची परीक्षा बघतो ती किती.

“देवा मला परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ दे.” रेवती स्वतःशीच बोलत होती.

रेवती बराच वेळ उद्यानात बसून, विचारांच्या प्रवाहात होती. काय करावे, काय नको, सुहासला काय वाटेल आणि एवढी मोठी गोष्ट त्याने का लपवली?

उद्यान बंद करण्याची शिटी वाजली तसा तो प्रवाह थांबला. आणि ती तिथून निघाली.

उद्यानातून निघत असताना तिची नजर समोर असलेल्या एक जोडप्यावर पडली.

झाडांना सुरक्षित करण्यासाठी दगडांनीं आखण्यात आलेल्या वलयांकित कठड्याजवळ ते जोडपे होते. त्यातील मुलगी त्या दगडी कठड्यावर बसली होती. तर मुलगा तिच्या पासून ४-५ हात अंतर दूर उभा होता.

एकमेकांशी हातवारे करत सांकेतिक भाषेत त्यांच्या गप्पा सुरु होत्या. एकही शब्द उच्चारला जात नसूनही त्यांचा संवाद केवढा बोलका वाटत होता. त्यांना पाहून कोण्या त्रयस्थ माणसालाही कळेल की ते एकमेकांच्या आकंठ प्रेमात आहेत.

"अदृश्य ती गोष्ट, पण अस्तित्व किती बोलके...

तरंग लहरींनी व्यापले, आसमंत दोन हृदयांतले."

प्रेमाला स्पर्शाची जोड लागतेच असे नाही. पण माणसाने प्रेम या अथांग भावनेला आपल्या स्वार्थासाठी किती संकुचित बनवून ठेवले आहे नाही.!!

रेवती विचार करत करतच उद्यानातून बाहेर पडली.

“इथे मी आणि सुहास अगदी धडधाकट असूनही आमच्यातला संवाद हरवत चालला आहे.  नाही असे होता कामा नये. काहीतरी करावेच लागणार.”

दुसऱ्या दिवशी रेवतीने सुहासला भेटायला जायचे ठरविले. तिने फोन केल्यावर नेहमी प्रमाणे त्याने उडवा उडवीची उत्तरे द्यायला सुरूवात केली. तो कसा व्यस्त आहे, त्याला किती काम आहे वगैरे वगैरे.

पण ती आज त्याचे काहीच ऐकणार नव्हती. तिने त्याला आपल्या शब्दांत अडकवून, शेवटी भेटायला येण्यासाठी भाग पाडलेच.

सुहासला पाहिल्या वर रेवतीला हुंदका आवरता आला नाही. रडायलाच सुरूवात केली. सुहासला काही कळण्यास मार्ग नव्हता.

पण तिने स्वतःला सावरले. आणि थेट प्रश्नालाच हात घातला. "तू काल हॉस्पिटल मधे काय करत होतास? मी काहीतरी विचारते आहे सुहास. तू आणि प्रतीक काल हॉस्पिटलमधे काय करत होता...?" रेवती

आता मात्र सुहासला शंका येऊ लागली होती की कदाचित रेवतीला सत्य परिस्थितीची जाणीव झाली असावी की काय... पण कसे शक्य आहे? नक्की काय झाले असावे.

नेमका परिस्थितीचा अंदाज न येऊन सुहासने नेहमी प्रमाणे या ही वेळेस सत्य लपवण्याचा प्रयत्न केला. तो तिला म्हणाला की तो एका नातेवाईकाला भेटायला गेला होता.

रेवती दोन मिनिटं त्याच्या कडे एकटक बघत होती. दुसऱ्याच क्षणी तिने त्याच्या एक सणसणीत कानाखाली ठेवून दिली.

## प्रकरण १८

सुहास २ मिनिटे अवाक झाला. तिच्याकडून अश्या प्रतिसादाची त्याने अपेक्षाच केली नव्हती.

रेवतीने सुहासच्या कानाखाली लावून दिली खरी पण नंतर ती त्याच्या गळयात पडून रडू लागली.

तिला तिच्या भावनांना आवर घालता आला नाही. इतक्या दिवसाची घुसमट आणि अस्वस्थता तिच्या डोळयांवाटे बाहेर पडत होती.

सुहासला रेवतीची एकंदरीत स्थिती पाहून आता पूर्ण खात्री पटली होती कि तिला सत्य परिस्थितीची जाणीव झालेली आहे. त्याच उद्विग्न मनःस्थितीत नियंत्रणाबाहेर जाऊन तिने हा प्रतिसाद दिला असावा.

आपल्या आजाराबद्दल हिला कळले म्हणजे प्रतीकला सांगायला भाग पाडले असणार रेवाने. नाहीतर तो स्वतःहून सांगणे शक्यच नाही.

प्रतीकने रेवतीला ते भेटले तेव्हा सगळे सांगितले होते. "रेवती मन घट्ट करून ऐक. ऐकल्यावर तुला त्रास होणार हे माहित आहे. त्याची जाणीव होती म्हणूनच मी आणि सुहासने तुला या सगळयांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. पण आज आमच्यावर तू हे सत्य उलगडण्याची वेळ आणलीसच."

रेवती अगदी प्राण पणाला लावून प्रतीक काय सांगणार याचा विचार करत होती. तिचे मन कदाचित काहीतरी अघटित घडल्याचा किंवा घडणार असल्याचा कौल देत होते.

फक्त तिच्या काळजाचा ठोका चुकायचा तेवढा बाकी राहिला होता.

“तर ऐक... सुहासचा ब्लड कॅन्सर दुसरी स्टेज संपून तिसऱ्या स्टेजमधे आहे. कळले आहे तसे हॉस्पिटलच्या फेऱ्या चालू आहेत..." प्रतीक

पुढील माहिती रेवतीला सुहासकडून हवी होती.

आणि म्हणूनच ती आज सुहासला भेटायला आली होती.  अगदी त्याची कोणतीही सबब न जुमानता.

## प्रकरण १९

सुहासने आजारपणाबद्दल आणि एकंदरीत सगळया परिस्थितीबद्दल रेवतीला माहिती दिली.

बराच वेळ शांतता पसरली होती.

ते दोघे निघाले तरी रेवती शांतच होती.

सुहासने एक-दोनदा तिच्या कडे पहिले. पण तिचे लक्ष नव्हते. एकटक कुठेतरी बघत विचार करत करत ती चालली होती.

विचारांच्या लाटेवर स्वार होत, त्या प्रवाहाबरोबर वाहत वाहत रेवती खूप पुढे निघून गेली. तिला काय करायचे होते हे तिने मनाशी पक्के केले होते.

त्या प्रवाहातून स्वतःला बाहेर खेचत, चालता चालता रेवती अचानक थांबली. सुहासला ही तिने हाताला पकडून थांबवले.

त्याचा हात हातात घेत त्याला विचारू लागली "तुझे माझ्यावर किती प्रेम आहे?" सुहासला या वेळेला हा प्रश्न अगदीच अनपेक्षित होता. त्यामुळे तो थोडा वेळ शांत उभा होता.

"बोल ना..." रेवती

"चांदण्यांची असंख्य फुले गगनांगणातून निखळून धरेवर यावी आणि धरेवरील ते सारे चांदण शिंपण वेचण्यासाठी जेवढा अवधी लागावा ना तेवढे प्रेम मी तुझ्यावर करतो." सुहास

सुहासच्या उत्तराने तिच्या चेहऱ्यावर आपसूकच एक निर्धाराची रेषा उमटली.

तिने त्याच्या डोळयांत खोलवर पहिले. त्याचा पकडलेला हात आणखी आश्वस्थपणे दाबत, त्या गवसलेल्या निर्धाराच्या पायरीवर चढून रेवती बोलू लागली...

“आपण आपल्या घरी सांगू या का आपल्या दोघांबद्दल? मला तुझी हक्काने काळजी घ्यायची आहे. इतके प्रयत्न करायचे आहेत की माझे प्रयत्न पाहून हा आजार आपल्या आयुष्यातून कायमस्वरूपी पळून जाईल.”

सुहास अर्थातच रेवतीच्या हा वेडेपणा पाहून अवाक झाला होता.

"हि मुलगी स्वतःचे आयुष्य मातीमोल करायला निघाली आहे. भविष्यात काय वाढून ठेवले आहे याची या क्षणी तरी कोणालाच कल्पना नाही. त्यामुळे असे पाऊल उचलणे शुद्ध मूर्खपणाचे ठरेल." सुहास विचार करत होता.

पण रेवती काहीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. तिच्यातील बंडखोर वृत्तीने तिच्या सद्सद्विवेक बुद्धिविरुद्ध बंड पुकारले होते.

## प्रकरण २०

रेवतीने सुहासचे काहीही ऐकले नाही. ती तिच्या निर्धारावर कायम होती.

तिने आधी स्वतःच्या घरी सांगितले.

अर्थातच रेवतीच्या आई-बाबांना धक्का बसला की आपली मुलगी प्रेमात आहे आणि या मुलीने आपल्याला याआधी साधी कल्पनाही दिली नाही.

पण त्याहून ही मोठा धक्का हा होता की ती व्यक्ती कॅन्सरपीडित आहे हे माहिती असूनही रेवती त्याच्याशीच लग्न करू इच्छित होती.

काळजाचा तुकडा असा स्वतःहून विहिरीत पडतोय हे बघून त्याला ते आपल्या डोळयांदेखत विहिरीत कसे पडू देणार होते. रेवतीच्या बाबांचा विरोध होता. ते रेवतीला म्हणले “भावुकता एकीकडे आणि वास्तविकता एकीकडे. संपूर्ण आयुष्याचा प्रश्न आहे. मी तुला हा असला वेडेपणा करू देणार नाही.”

पण रेवती कोणाचेच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. त्यामुळे रेवतीच्या बाबांनी हे प्रकरण जरा वेगळया पद्धतीने हाताळण्याचे ठरविले.

त्यांनी सुहासला घरी बोलावून घेतले. एकांतात त्याच्याशी बोलायचे होते. त्यांची काळजी सुहासच्या लक्षात आली होती.

तो ही तेच म्हणाला “ती अजिबात ऐकत नाही आहे. मी तिला माझ्या पासून तोडण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती काही ऐकत नाही. यावर काय उपाय करावा कळेना.”

सुहास आणि रेवतीचे बाबा बराच वेळ विचार करत होते. पण रेवतीच्या निर्णयाने दोघांची पुरती कोंडी झाली होती. सुहास आणि प्रतीक त्यामुळेच तिला सुहासपासून तोडण्याचा, वेगळया पद्धतीने तिच्या नकळत प्रयत्न करत होते. पण तोही फसला होता.

सुहासच्या डोक्यात अचानक वीज चमकावी तसा विचार चमकून गेला. ती कल्पना त्याने रेवतीच्या वडिलांना बोलून दाखविली.

“आत्ता फक्त साखरपुडा करायचा. तोही अगदी घरगुती छोटासा. रेवतीच्या समाधानासाठी. जास्त गाजावाजा करायचा नाही जेणेकरून या गोष्टीची फार चर्चा होणार नाही. रेवती कदाचित साखरपुडा मोठा करू म्हणेल. तेव्हा तिला लग्न थाटामाटात गाजतवाजत करायचे असे सांगता येईल. आपण वडीलधारे आणि अनुभवी आहात. आपण विचार करावा. आपल्या निर्णयानंतरच काय ते पुढे ठरविता येईल."

किमोथेरपी आणि इतर उपचारांनंतर बरा होऊन तो घरी आल्यावर लग्न. तिच्या बाबांना ही हा विचार पटला.

सुहासनेच हे रेवतीला सांगयाचे असे ठरले.

## प्रकरण २१

सुहास आणि रेवती बाहेर भेटले. त्याने तिला विचार बोलून दाखविला.

अपेक्षेप्रमाणेच सुरुवातीला तिला काही पटेना. मग सुहासने त्याला कशी लग्नाची दगदग सहन होणार नाही आणि त्याला करायचे म्हणून लग्न करायचे नाही तर ते थाटामाटात करायचे आहे असे सांगितले.

मग ती थोडी निवळली आणि तयार झाली.

सुहासने ही आपल्या घरी सांगितले. त्याच्या आईला थोडा संशय आलाच होता. पण बाबांना अजिबात माहीत नव्हते. म्हणून त्यांनी विचार करायला वेळ घेतला. त्याच्या घरून फार विरोध झाला नाही. पण तिला आणि तिच्या घरच्यांना तुझ्या आजराची कल्पना आहे ना असे त्याच्या आई-बाबांनी विचारले.

सुहासने त्याचे आणि रेवतीच्या बाबांचे संभाषण सविस्तरपणे त्याच्या आई-बाबांना सांगितले.

"तिलाही आणि तिच्या घरच्यांना ही. तिला माहीत आहे. तिने तिच्या घरी सांगितलेले आहे आणि मी देखील तिच्या बाबांना भेटलो आहे. आत्ता फक्त साखरपुडा करायचा आहे. बरे झालो तर लग्न…”

सुहास बोलून गेला खरे पण त्याच्या आई- बाबांचे डोळे पाणावले.

दोघांच्या आई-बाबांच्या भेटीगाठी झाल्या. ठरल्याप्रमाणे अतिशय साधेपणाने आणि घरगुती लोकांच्या उपस्थितीत साखरपुडा आनंदात पार पडला.

आता रेवती हक्काने त्याच्या बरोबर हॉस्पिटलमधे जाऊ शकत होती. तासन तास ती हॉस्पिटल मधे बसून राहायची. किमोथेरपी नंतर त्याला बरोबर घरी नेऊन सोडत होती. अशीच दैनंदिनी चालू होती.

किमोथेरपीमुळे सुहासची तब्बेत खालावत चालली होती. डोक्यावरचे सगळे केस उडाले. अगदी त्याच्या कडे बघवत नव्हते.

असे असले तरीही किमोथेरपीला सुहासचे शरीर चांगला प्रतिसाद देत होते आणि डॉक्टरांना थोडी सकारात्मक चिन्हे दिसू लागली होती. आशा वाटू लागली होती. १०% पासून आता ४०% पर्यंत सुहासच्या जगण्याची आशा वाढली होती.

किमोथेरपीचे आजचे शेवटचे सेशन करून सुहास बाहेर आला. डॉक्टरांनी त्याला सकारात्मक ऊर्जा दिली “प्रतिसाद खूप चांगला आहे सुहास तुझा. आता औषधे वेळेवर घे आणि मला दोन दिवसांनी दाखवायला ये.”

हे सगळे ऐकून सुहासच्या ही मनात जगण्याची थोडी आशा पल्लवित झाली होती.

प्रकरण २२

रेवतीने त्याला घरी सोडले. डॉक्टर काय म्हणाले ते सुहासच्या आई-बाबांच्या कानी घातले. सुहासच्या आईने देवा समोर साखर ठेवली.

सुहास दोन दिवसांनी परत डॉक्टरकडे गेला. गोळयांना ही त्याचे शरीर चांगला प्रतिसाद देत होते. डॉक्टर आता खूप पॉज़िटिव वाटत होते. डॉक्टरांनी त्याला आता पुढील तीन महिन्याचा आराखडा लिहून दिला... गोळया, औषधे, पथ्य-पाणी आणि डॉक्टरांना भेटण्याच्या वेळा.

सर्व ठरल्याप्रमाणे चालले होते. अडीच महिन्या मधेच सुहासने ट्रेमेंडस रिकव्हरी दाखविली. डॉक्टरांनी ते सर्व अजुन १ महिना चालू ठेवले.

१ महिन्यात परत जवळ जवळ पूर्ववत होणाच्या कक्षेत आलेल्या सुहासला त्रास होऊ लागला.  डॉक्टरांनाही अचानक काय झाले याचा अंदाज येईना.

सुहासची हालत आता वरचेवर खराब होऊ लागली होती. त्याला बेडवरुन उठणे तसेच काही हालचाल करणे अतिशय अवघड आणि वेदनादायी ठरत होते.

किमोथेरपी झाल्याने तो अतिशय अशक्त आणि केविलवाणा दिसत होता. डोक्यावरचे केस पूर्ण झडले होते.

खाण्यापिण्यात त्याला काडीचाही रस उरलेला नव्हता. थोडे फार लिक्विड पोटात जात होते तेवढेच काय ते.

त्याचे कशात लक्ष लागत नव्हते. आजूबाजूला काय चालले आहे याचे भान नव्हते.

हळूहळू माणसेही ओळखायची बंद झाले होते त्याचे.

रेवती फार खचत चालली होती या सगळयाने. तिला आपलाही सुहाससोबत शेवटाकडे प्रवास सुरु झाल्याचे आतून जाणवत होते. पण तिचे मन ऐकायला तयार नव्हते.

सुहास थोडा बोलायच्या परिस्थिती होता तेव्हा रेवती जवळ त्याने आपल्या मनातील इच्छा बोलून दाखवली होती.

"रेवा, आपल्याकडे पैसे होता. तू, आई-बाबा होतात म्हणून आपण चांगल्यातील चांगले उपचार घेऊ शकलो. तेही प्रयत्न कदाचित अपुरे पडत आहेस असे दिसत आहे. राहून राहून मनात एकच येतोय ग..."

प्रकरण २३

खरेतर सुहासचे मनोधैर्य खचताना पाहून रेवतीला खूप त्रास होत होता. पण आपण खचलो तर सुहासचे उरले सुरले अवसानहि गळून पडण्याची शक्यता लक्षात घेता, ती जास्तीत जास्त धैर्य एकवटून सुहासचे बोलणे ऐकण्याचा प्रयत्न करत होती.

“आपल्याकडे साधने आणि ती वापरण्याकरिता लागणारा पैसा उभा करण्याची ताकद असूनही आपले प्रयत्न आयुष्य वाचवायला कमी पडत आहेत.

ज्यांना पैश्याअभावी किंवा इतर अडचणींमुळे या साधनांना ऍक्सेस मिळत नाही त्यांचे काय होत असेल. खरेच विचारही करवत नाही ग रेवा..."

रेवतीला सुहासचा हाच स्वभाव फार आवडत होता. मागेही गरज नसताना चाकूच्या हल्ल्याचा शिकार झाला होता.

त्याचे मन सतत सामाजिक बांधिलकी जपत विचार आणि त्या अनुषंगाने कृती करण्याचा प्रयत्न करत असे.. आताही मृत्यूच्या शय्येवर असताना इतरांचा विचार करत होता.

रेवतीच्या भावना आता मात्र उफाळून आल्या होत्या आणि इतकावेळ सामंजस्याने सुहासचे बोलणे ऐकणारी ती सुहासच्या हातावर डोके टेकवून बराच काळ रडली.

सुहास त्राण कमी झालेल्या दुसऱ्या हाताने तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत होता. बहुधा त्यालाही त्याचा नजीकचा भविष्यकाळ ठळक दिसू लागला असावा.

भावनांच्या आवेगाला बांध घालणे प्रत्येक वेळेस माणसाच्या हातात असतेच असे नाही. बऱ्याचदा माणूस आवेगाच्या भरतीच्या लाटेवर त्याच्या नकळतच स्वार होतो आणि काही काळासाठी वेगळयाच प्रदेशात शिरतो.

सुहासची परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती. हळूहळू गोळया औषधे आणि उपचारालाही त्याच्या शरीराने प्रतिसाद देणे बंद केले.

आणि १५ दिवसांतच सुहासने या जगाचा निरोप घेतला.

प्रकरण २४

रेवती अपेक्षेप्रमाणेच सुरवातीला पार कोलमडून गेली होती. तिला जरी शेवटी शेवटी होणाऱ्या गोष्टीची कुणकुण लागली होती, तरीही प्रत्यक्षात ती गोष्ट घडल्यावर मान्य करणे फार कठीण असते.

माणूस बराच काळ आठवणींच्या गाठोड्याला उराशी कवटाळून, गेलेल्या माणसाच्या सोबतच वावरत असतो.

प्रतीकही हे सारे पाहत होता. तो हि फार खचून गेला होता. पण कोणीतरी रेवतीचे लक्ष सुहासच्या ध्येयाकडे ओढणे गरजेचे होते.

थोडे दिवसांनंतर सुहासच्या ध्येयासाठी आपल्याला काय करावे लागेल या संदर्भात प्रतीक रेवतीशी बोलला. तिचे लक्ष ध्येयाकडे ओढणे गरजेचे होते.

ते काम प्रतीकने चोख पार पाडले.

आता त्या दोघांना सुहासचे ध्येय खुणावत होते.

अर्थातच हॉस्पिटल उभे करणे हि सामान्य माणसाच्या अवाक्यापलीकडची गोष्ट आहे. त्यासाठी कोणत्या तरी सेवाभावी (एनजीओ) संस्थेशी जोडले जाऊन त्या दृष्टीने पाऊले उचलणे गरजेचे होते.

त्याप्रमाणेच "ध्यास" या सेवाभावी संस्थेशी जोडले जाऊन... तब्बल ७ वर्षांच्या अथक मेहनतीनंतर, प्रतीकच्या मदतीने... रेवतीने त्याच्या शेवटच्या इच्छेला हॉस्पिटलच्या रूपात साकार केले होते.

या हॉस्पिटलचा उद्देश रुग्णांना कमीत कमी खर्चात गरजेच्या साऱ्या सुविधा उपलब्ध करून देणे होता.

सुहासचा सामाजिक बांधिलकी जपण्याचा वसा इथून पुढे रेवती जपणार होती.

"आज सुहास असता तर..." या विचाराने तिच्या डोळयात पाणी तरळले.

सगळ्या विषम परिस्थितीवर मात करत, रेवती आणि सुहासच्या प्रेमाने "चिरंतन लाईफ केअर" हॉस्पिटलच्या स्वरूपात आज उच्चांक गाठला होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

“प्रेम नाव न फक्त सहवासाचे,

ती भावना जी व्यक्त करायला

कमी पडतात समुद्र शब्दांचे…

प्रेम नाव न फक्त सहवासाचे,

हृदयात मूर्तिमंत करून एकमेकांना

आयुष्यभर एकमेकांच्या ध्येयासाठी जगण्याचे...”

सुहासच्या आठवणींच्या कवडश्यातून बाहेर पडून हॉस्पिटलमधील माणसांच्या गर्दीत रेवती सामील झाली.

***** समाप्त *****

# ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

मोठाच वेगवान काळ आहे हा. तंत्रज्ञानात वेगवान बदल होत आहेत. समाजात वेगाने उलथापालथी होत आहेत. राजकारण अचानक वेगवान घटनांनी भारलेलं आहे. तरूण मंडळींना नवनवीन गॅजेट्सची ओळख होत आहे. कम्म्युनिकेशनची नवनवीन माध्यमं उदयाला येत आहेत आणि अंतही पावत आहेत. ऑर्कुट आलं आणि गेलं. फ़ेसबुक, इन्स्टा, टिकटॉक, ट्विटर, ब्लॉग्ज, मेल्स, व्हॉट्सप, व्हिडिओ कॉल्स असे असंख्य पर्याय उपलब्ध होत असताना संवादाची भाषा म्हणून मराठी टिकेल का आणि कोणत्या स्तरावर टिकेल हा प्रश्न उभा झाला आहे. आणि आम्ही म्हणतो की ती केवळ टिकणार तर आहेच पण दिवसेंदिवस मराठीचा वापर वाढत जाईल, तिची ताकद वाढत जाईल आणि मराठीतील पुस्तकांची संख्या आणि त्यांचा दर्जा जागतिक स्तरावर जाईल, अगदी इंग्रजीलाही टक्कर देऊन आपली आंतरिक क्षमता सिद्ध करील.

आणि हे सर्व करणार तुम्ही आम्ही.

मराठीचा वापर करा. मराठी पुस्तके वाचा. मेल्स, मेसेज मराठीत करा. मुलांना मराठी माध्यमात शिकवा. मराठीत नवनवीन साहित्य आणि पुस्तके यायला मदत करा. आणि आपल्या मित्रांना व नातेवाईकांना या यज्ञात भाग घ्यायला प्रवृत्त करा.

जय हिंद.

जय महाराष्ट्र